ePaper

## “एकनाथ शिंदेंनी स्वत: मातोश्रीवर पैसे दिले”:संजय गायकवाड



| वर्ष - 7 | अंक -22 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

किशोर आवारेंचे खूनी सुटणार नाहीत!
पीएमआरडीएच्या १ हजार ९२६ कोटींच्या अर्थसंकल्पास मान्यता

www.mahaenews.com | गुरुवार, दि. 17 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# भ्रष्टाचाराच्या मुद्यावर पिंपरी-चिंचवड ‘राष्ट्रवादी काँग्रेस ‘सरेंडर’?

## भामा आसखेडच्या ‘जॅकवेल’ चा विरोध मावळला : पाणी पुरवठ्याचे श्रेय भाजपाने घेतले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आंद्रा आणि भामा आसखेड प्रकल्पामुळे पिंपरी-चिंचवडला २६७ एमएलडी पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. त्यामुळे आगामी ३० वर्षांत पिंपरी-चिंचवड जलस्त्रोतांमध्ये आत्मनिर्भर होणार आहे. भारतीय जनता पार्टीने या प्रकल्पांचे श्रेय वाजत-गाजत घेतले. मात्र, ‘जॅकवेल’ मधील भ्रष्टाचाराच्या मुद्यावर अकांडतांडव करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने गुडघे टेकले का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे.**




भामा आसखेड प्रकल्पांतर्गत धरणात पाणी उपसा करण्यासाठी जॅकवेल उभारण्यात येणार आहे. त्या कामाची निविदा प्रक्रिया महापालिका प्रशासनाने राबवली होती. मात्र, या कामात भ्रष्टाचार झाला आहे, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केला होता. मात्र, महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी ‘व्यापक जनहित’ चा मुद्दा पुढे करुन निविदा प्रक्रिया राबवली. यावर गव्हाणे यांनी न्यायालयात दाद मागणार, अशी भीष्मप्रतिज्ञा केली होती.

वास्तविक, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सत्ताकाळात पाटबंधारे विभागाकडून आंद्रा आणि भामा आसखेड प्रकल्पातील पिंपरी-चिंचवडसाठीचे पाणी आरक्षण जाहीर झाले होते. मात्र, तत्कालीन सत्ताधारी राष्ट्रवादीने शहराशी निगडीत महत्त्वाच्या मुद्याकडे दुर्लक्ष केले.

त्याचा फटका आता गव्हाणे आणि टीमला बसत आहे. आता राष्ट्रवादीच्या काळातील प्रकल्पांचे भूमिपूजन व लोकार्पण भाजपा करीत आहे, अस म्हणण्या व्यतिरिक्त राष्ट्रवादीच्या हातात काहीही राहिले नाही. पिंपरी-चिंचवड शहरासाठी भामा आसखेड आणि आंद्रा धरणातील मंजूर पाणी आणण्यासाठी टाकण्यात येणाऱ्या 26 किलोमीटर जलवाहिनीच्या कामासाठी आवश्यक जागेचे भूसंपादन करण्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्देश देताच जिल्हा प्रशासन खडबडून जागे झाले. जागेचे भूसंपादन करण्यासाठी मावळ आणि खेड उपविभागीय अधिकाऱ्यांची जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी नियुक्ती केली आहे.

### राष्ट्रवादीचे भ्रष्टाचाराचा मुद्दा सोडला का?

» भामा आसखेड जॅकवेल प्रकरणात अजित गव्हाणे यांनी न्यायालयात दाद मागितली होती. मात्र, त्यासाठी काही रक्कम भरण्यात सांगितल्याचे प्रशासनाकडून समजले. मात्र, याबाबत अधिकृत माहिती अद्याप आलेले नाही, असे स्पष्टीकरण अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे-पाटील यांनी केला. त्यामुळे राष्ट्रवादीसह अजित गव्हाणे यांनी ‘जॅकवेल’मधील भ्रष्टाचाराचा मुद्दा सोडला का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे.

### फडणवीसांमुळे पाणी प्रकल्पांना गती...

» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन, उद्‌घाटनने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी झाले. या कार्यक्रमात बोलताना फडणवीस यांनी भामा आसखेड आणि आंद्रा धरणातील संपूर्ण मंजूर पाणी आणल्याशिवाय पिंपरी-चिंचवड मधील नागरिकांना पुरेसे पाणी मिळणार नाही. आंद्रा आणि भामा आसखेड या दोन धरणातून 267 एमएलडी पाणी पिंपरी-चिंचवडला आरक्षित केले आहे. आंद्रा धरणातून शंभर एमएलडी पाणी उचलण्यात येणार आहे. यातून शहरातील पाणी समस्येवर तोडगा निघणार आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या तिजोरीत खणखणाट!

## 2023-24 च्या आर्थिक वर्षातील अवघ्या दीड महिन्यात शंभर कोटींची कर वसुली

।पिंपरी । महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड शहरातील ८७ हजार ४५६ मालमत्ताधारकांनी २०२३-२४ च्या आर्थिक वर्षातील अवघ्या दीड महिन्यात शंभर कोटींचा कर महापालिका तिजोरीत जमा केला आहे. यामधील ७० हजार मालमत्ता धारकांनी ऑनलाईन कराचा भरणा करून विविध सवलतींचा लाभ घेतला आहे.**




शहरात औद्योगिक, निवासी, बिगर निवासी, मिश्र आणि मोकळ्या जमीन अशा पाच लाख ९८ हजार मालमत्ता आहेत. महिला बचत गटांनी शहरातील निम्म्यापेक्षा जास्त मालमत्ता धारकांना घरपोच देयकांचे वाटप आणि माहितीचे अद्ययावतीकरण केले आहे. याचाच परिणाम म्हणून अवघ्या दीड महिन्यात ८७ हजार ४५६ मालमत्ता धारकांनी शंभर कोटी ७२ लाखांचा कर महापालिका तिजोरीत जमा केला आहे. याचबरोबर ३१ मार्च २०२३ अखेर ज्यांची एक लाखांपेक्षा जास्त थकबाकी होती, अशा २२ हजार मालमत्तांना जप्तीपूर्व नोटीस देण्याचे मालमत्ताकराच्या देयकाबरोबर देण्याचे काम सुरू आहे. देयकांचे वाटप होताच जप्तीची कारवाई करण्यात येणार असल्याचे साहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले.

# किशोर आवारेंचे खूनी सुटणार नाहीत!

## चंद्रकांत पाटलांचा आवारे कुटुंबियांना शब्द !

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**"किशोर आवारे हा एक चांगला सामाजिक कार्यकर्ता होता, गरिबांची, दीनदुबळ्या, सर्वसामान्यांची कामे करत होता. आवारेंची झालेली हत्या हा अत्यंत निंदनीय प्रकार आहे. ही हत्या ज्यांनी केली, त्यांच्यापैकी कुणीही सुटणार नाहीत. जे कोणी आवारेंच्या हत्येला दोषी आहेत, त्यांना कठोर शासन होणार, त्यासाठी मी स्वत: यामध्ये लक्ष घालणार आहे," असा शब्द राज्याचे मंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आवारेंच्या कुटुंबियांना दिली.**



चंद्रकांत पाटील यांनी मंगळवार (ता. १६) तळेगाव दाभाडे या ठिकाणी मयत किशोर आवारे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. तसेच, याबाबत जे कोणी दोषी असतील त्यांना लवकरच कडक शासन करणार, असे आश्वस्त केले. आवारे कुटुंबियांचे सांत्वन करताना चंद्रकांत पाटील भावुक झाले होते.

यावेळी स्थानिक नेते व माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, भाजप जिल्हा-अध्यक्ष गणेश भेगडे, भाजप पदाधिकाचे राजेंद्र जांभुळकर, चंद्रकांत शेटे, किरण राक्षे उपस्थित होते.

यावेळी किशोर आवारे यांच्या आई सुलोचना आवारे, त्यांची पत्नी विद्या आवारे, बंधू रवींद्र आवारे, कन्या प्रियंका आवारे, मामा बाळासाहेब काकडे, रामदास काकडे, गणेशकाकडे यांनी किशोर आवारेंच्या खून्यांना फाशीचीच शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी केली.

### काय आहे प्रकरण ?

»तळेगाव दाभाडे येथे नगरपरिषद कार्यालयासमोर दि. १२ मे रोजी भर दुपारी जनसेवा विकास समितीचे प्रवर्तक किशोर गंगाराम आवारे(वय ५०) यांची चार हल्लेखोरांनी निर्घृण हत्या केली. जमिनीच्या वादातून किंवा राजकीय वैमनस्यातून हत्या झाल्याचा संशय आहे.

या खून प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील शेळके, त्यांचे बंधू सुधाकर शेळके यांच्यासह सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आमदार सुनील शेळके यांनी किशोर आवारेंचा खून केल्याचा आरोप आवारेंच्या आईने केला आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे.

याप्रकरणी आवारे यांच्या आई माजी नगराध्यक्षा सुलोचना आवारे यांनी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील शेळके, सुधाकर शेळके, संदीप गराडे, श्याम निगडकर यांच्यासह अन्य तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पीएमआरडीएच्या १ हजार ९२६ कोटींच्या अर्थसंकल्पास मान्यता!

## 100 टक्के अतिरिक्त विकास शुल्क माफ करण्याची घोषणा

। मावळ। महाईन्यूज ।



**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधीकरणाची बैठक आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. प्राधिकरणाच्या या वर्षाच्या १ हजार ९२६ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पास मान्यता यावेळी देण्यात आली. जुलै २०१८ ते एप्रिल २०२३ या पाच वर्षांच्या काळातील प्राधिकरणाकडून विकास आणि बांधकाम प्रकरणांमध्ये वसुल करण्यात येणारे १०० टक्के अतिरिक्त विकास शुल्क माफ करण्याची घोषणा यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.**

सह्याद्री अतिथीगृह येथे पीएमआरडीए प्राधिकरणाची दहावी बैठक झाली. यावेळी पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत, मुख्य सचिव मनोज सौनिक, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, पीएमआरडीएचे महानगर आयुक्त राहुल महिवाल, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह आदी अधिकारी उपस्थित होते. पुणे मेट्रो लाईन ३ हा महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प घोषीत केल्याने १८ जुलै २०१८ ते १६ एप्रिल २०२३ पर्यंत मंजूर केलेल्या प्रकरणांमध्ये १०० टक्के वाढीव अतिरिक्त विकास शुल्काच्या थकबाकी वसूली चा प्रस्ताव या बैठकीत चर्चेला ठेवला होता. त्यावर या पाच वर्षाच्या काळातील वाढीव अतिरिक्त विकास शुल्क माफ करण्यात यावे असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. तसेच एप्रिल २०२३ पासून जे अतिरिक्त विकास शुल्क लावले जात आहे, ते सरसकट न लावता क्षेत्रनिहाय देता येईल काय हे तपासण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. माफ केलेल्या वाढीव विकास शुल्काची रक्कम सुमारे ३३२ कोटी एवढी आहे. यावेळी मोशी पुणे (पीआयईसीसी) येथील अडीच एकर जागा छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मारकासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेला हस्तांतरीत करण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी मान्यता देण्यात आली.

पीएमआरडीएचा विकास आराखडा २० जूनपर्यंत सादर करण्यासाठी स्वतंत्र बैठक आयोजीत करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आल्या यावेळी पुणे रिंग रोड प्रकल्प, प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातून पुणे महापालिका हद्दीमध्ये समाविष्ट झालेल्या ११ व २३ गावांचा विकासनिधी त्याचबरोबर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सुरक्षा उपाययोजना अधिनियम २०२३ ची पीएमआरडीए क्षेत्रात अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली.

### अर्थसंकल्पाच्या पुस्तिकेचे प्रकाशन

**»पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या बसेस पीएमआरडीएच्या क्षेत्रात चालविल्या जातात या महामंडळाला जो तोटा सहन करावा लागतो त्यापोटी १८८ कोटी एकवेळ देण्यास यावेळीमान्यता देण्यात आली. यावेळी प्राधिकरणाच्या अर्थसंकल्पाच्या पुस्तिकेचे प्रकाशन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.**



# अतिक्रमण विरोधी कारवाई करताना सुरक्षारक्षकाला मारहाण; पाच जण अटकेत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

अतिक्रमणाविरुद्ध कारवाई करण्यास गेलेल्या महापालिकेच्या सहायक निरीक्षकासह सुरक्षा रक्षकाला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना पुण्यात मंगळवारी घडली होती. या घटनेमुळे पुण्यात एकच खळबळ उडाली.

महापालिकेच्या सहायक निरीक्षकासह सुरक्षा रक्षकाला मारहाण करणाऱ्या पाच जणांना पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी प्रशांत प्रल्हाद कोळेकर यांनी फिर्याद दिली होती. त्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली.

या प्रकरणात बंडगार्डन पोलिसांनी सातजणांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. त्यापैकी पाच जणांना आज अटक करण्यात आली आहे. गणेश परदेशी, रोहित परदेशी, रोहन परदेशी, महेश परदेशी, सूरज परदेशी, अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

प्रशांत कोळेकर हे महापालिकेमध्ये सहायक अतिक्रमण निरीक्षक आहेत. ते मंगळवारी ए.आय.एस.एस. एम.एस. कॉलेजजवळ कैलास स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याची कारवाई करत होते. मात्र, याचवेळी ही कारवाई न करण्यासाठी आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

याबरोबरच सुरक्षा रक्षक आकाश लोखंडे यांनाही मारहाण करण्यात आली होती. यामध्ये ते जखमी झाले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींविरुद्ध सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून त्यापैकी पाचजणांना आज अटक करण्यात आली आहे.

# भुमकर चौकातील वाहतूक कोंडी मिटणार!

## महापालिकेकडे वारंवार तक्रारी प्राप्तः आयटीयन्सना दिलासा मिळणार

।पिंपरी चिंचवड ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**भुमकर चौक ते हिंजवडी शिवाजी चौक रस्त्यामधील खुप दिवसांपासुन प्रलंबित असलेला स.नं. 83 पै. मधील रस्त्याचे जागेचा तोडगा निघाला. त्यामुळे या चौकातील वाहतूक कोंडीचा प्रश्न मिटणार आहे. आयटीयन्सना दिलासा मिळणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका परिसरामधील प्रजिमा 31 रस्ता हा हिंजवडी आयटी पार्क व भोसरी चिखली एमआयडीसीला जोडणारा मुख्य रस्ता आहे. त्यामुळे सदर रस्त्यावर वाहनांची खुप गर्दी असुन भुमकर चौकात वारंवार वाहतुक कोंडी होते. तसेच या वाहतुक कोंडीबाबत महापालिकेकडे वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत. आयुक्तांनी यांनी रस्त्यावर 25 मे रोजी समक्ष भेट देऊनस्थळ पहाणी केली.**

भुमकर चौक ते शिवाजी चौक हिंजवडी मधील स.न. 83 (पै.) मध्ये मंजुर विकास योजनेनुसार 30 मीटर रुंदीप्रमाणे रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे. तथापि, रुंदीकरणाची जागा न्यायालयात दावा दाखल असल्याने मनपाच्या ताब्यात आलेली नाही, त्यामुळे या ठिकाणी मनपास रस्तारुंदीकरण करता आले नाही.

ही जागा ताब्यात घेणेबाबत महापालिका आयुक्त यांनी पुढाकार घेऊन अतिरिक्त आयुक्त, नगररचना विभाग, स्थापत्य प्रकल्प विभाग आणि संबंधित जागामालक यांच्या समवेत बैठक घेऊन सदरची जागा ताब्यात देणेकामी जागामालकांना विनंती करुन त्यांची संमती घेतली.

या ठिकाणी पुढील काही दिवसांमध्ये रस्त्याचे सन 2015 पासुनचे (WAKAD) रखडलेले उर्वरीत काम सुरु करता येणार आहे. या रस्त्याचे काम पुर्ण झाल्यानंतर वाकड भुमकर चौक ते शिवाजी चौक हिंजवडी या रस्त्यावरील वाहतुक कोंडीचा प्रश्न निकाली निघण्यास मदत होणार आहे.



# आषाढीवारी हरितवारी करण्याच्या दृष्टीने नियोजन

## संबंधित विभागांना तातडीने कामकाम करण्याच्या महापालिकेच्या सूचना

।पिंपरी ।महाईन्यूज ।

**आषाढीवारीच्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने स्थापत्य, आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा, सुरक्षा व्यवस्थेबरोबरच यंदाची वारी पर्यावरणपूरक,प्लास्टिक मुक्त, हरितवारी करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने संबंधित विभागांना तातडीने कामकाम करण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ यांनी दिल्या.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या जून महिन्याच्या आषाढीवारी पालखी सोहळा सन 2023 च्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने वारकऱ्यांकरिता पुरविण्यात येणा-या विविध सेवासुविधांचे आणि इतर नियोजन करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त वाघ यांच्या अध्यक्षतेखाली तसेच अतिरिक्त प्रदीप जांभळे पाटील आणि उल्हास जगताप यांच्या विशेष उपस्थितीत दोन्ही संस्थानांच्या विश्वस्तांबरोबर आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी महापालिकेने तयार केलेल्या कृती आराखड्याचे सादरीकरणानंतर मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त वाघ बोलत होते.

पोलीस उप आयुक्त विवेक पाटील, उप आयुक्त रविकिरण घोडके, सहाय्यक पोलीस आयुक्त श्रीकांत दिसले, अन्न व औषध प्रशासन सहाय्यक आयुक्त प्रशांत लायगुडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल आदे, सहाय्यक प्रादेशिक परिवहन पवन नव्हाडे, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संस्थाचे प्रमुख विश्वस्त योगेश देसाई, विश्वस्त विकास ढगे पाटील, उत्तम माने, जगदगुरू संत तुकाराम महाराज संस्थांचे विश्वस्त माणिक मोरे, पालखी सोहळा प्रमुख अनिल मोरे, भानुदास मोरे,संजय मोरे, विठ्ठल मंदिर आकुर्डीचे विश्वस्त माजी नगरसेवक गुलाब कुटे, प्रमोद कुटे,बाळासाहेब कुटे आदी उपस्थित होते.

### बैठकीत विविध सूचना

बैठकीत संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज संस्थान कमिटीच्या वतीने विश्वस्तांनी विविध सूचना केल्या. त्यामध्ये महापालिकेच्या वतीने महापालिका कर्मचारी आणि वारकरी प्रतिनिधी असा संयुक्त स्वागत कक्ष उभारला जावा. जेणेकरून वारकरी दिंडी प्रमुखांना संपर्क साधणे सोईस्कर होईल ,पिण्याच्या पाण्याची मुबलक सोय करावी, रस्त्यातील अतिक्रमणे दूर करावीत, पोलीस बंदोबस्तात वाढ व्हावी, पालखी मार्गावर देशी वृक्षांची लागवड करावी, सार्वजनिक शौचालयांची संख्या वाढवावी, मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा, कार्डियाक ॲम्बुलन्सची सोय करावी, स्वागत कमानीवरील रंगरंगोटी व दिव्यांची दुरूस्ती करावी, वारकऱ्यांचे भिंतीचित्र खराब झाले आहे.

# नरेगाच्या अंमलबजावणीचे त्रांगडे!




नरेगाची जबाबदारी केंद्रीय तसेच राज्य पातळीवरील ग्रामीण विकास खात्याकडे आहे. या योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर करून नवीन पद्धती आणण्याची आणि नियमावली करण्याची गरज आहे.

महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेची मागणी साधारणपणे होळीनंतर वाढत जाते व खरिपाची कामे सुरू झाली की कमी होत जाते हा अनेक वर्षांचा अनुभव आहे. पण या वर्षी एप्रिल आणि मे महिन्यात खूपच कमी जिल्ह्यांत नरेगाची कामे सुरू आहेत हे अत्यंत क्लेशकारक आहे. आज ११ जिल्ह्यांत चक्क शून्य कुटुंबे काम करताना दिसत आहेत म्हणजे कामे सुरूच नाहीत. फक्त नऊ जिल्ह्यांत १०० हून अधिक कुटुंबे कामावर आहेत असे नरेगाच्या वेबसाइटवरची आकडेवारी सांगते. मागील पाच वर्षांत मे महिन्यात जिथे चार ते आठ लाख कुटुंबे कामावर होती तिथे आज चार हजारसुद्धा नाहीत! अंमलबजावणीतील तरतुदीत काही बदल केल्याने तालुक्याच्या गटविकास अधिकाऱ्यांनी (बीडीओ) नरेगाचे काम करण्याबाबत नाराजी व्यक्त केली आणि काम हाती घेणार नाही असे सांगितले म्हणून ही परिस्थिती उद्भवली असे समजते. पण हे कारण तात्कालिक आहे. महाराष्ट्रातील नरेगा अंमलबजावणीचे त्रांगडे सुटत नाहीये हे समजून घेणे आवश्यक आहे. यासाठी थोडे इतिहासात डोकावूया.

आपण सारे जाणतोच की १९७२ च्या दुष्काळात रोजगार हमी योजना ही या संकटाला सामोरे जाणाऱ्या ग्रामीण जनतेच्या हाताला काम देणारी योजना म्हणून राबवली गेली. नंतर ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधने व पायाभूत सुविधा निर्माण करण्याची या योजनेची ताकद लक्षात आली. आणि १९७७ साली या योजनेचे गरिबांना हक्काचा रोजगार देऊन गाव विकासासाठी संसाधने निर्माण करणाऱ्या कायद्यात रूपांतर झाले. अशा रीतीने कायद्याचे कोंदण लाभलेली ही योजना वर्षानुवर्षे राबवली जात आहे.

या योजनेची अंमलबजावणी करताना, ती राबवणाऱ्यांना आणि त्यावर काम करणाऱ्या गावकऱ्यांना अनेक भले-बुरे अनुभव येत राहिले. चर्चाविश्वात



उपलब्धीपेक्षा बदनामीचा सूर चढा राहिला आणि यमेजनेचा प्रभाव कमी होत गेला.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा अस्तित्वात आल्यावर महाराष्ट्रातील या योजनेला नवसंजीवनी मिळण्याची संधी प्राप्त झाली. काळानुसार राष्ट्रीय कायद्यात काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यांचा महाराष्ट्राने अंगीकार करणे आवश्यक होते. ग्रामसभेतच नरेगाच्या कामांचे नियोजन करून त्यातील ठरावाप्रमाणे आराखडा तयार करणे हे पंचायत राजच्या तत्त्वाला धरून आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीत, ग्रामसेवकांनी नरेगाच्या कामात मदत करणे अपेक्षित धरले होते. सत्तरीच्या दशकातल्या योजनेला माहिती तंत्रज्ञानाची जोड देऊन पारदर्शकता वाढवणे हे माहिती अधिकाराच्या कायद्याला धरून ठरले. यासाठी संगणक आणि त्या भोवतालची सुविधा प्रत्येक तालुक्यात असणे आवश्यक झाले. आपल्या राज्यातील योजना संपूर्ण वर्षांची हमी देते आणि राष्ट्रीय योजना १०० दिवस प्रति कुटुंब. म्हणजे आता १०० दिवसांचा निधी केंद्र सरकारकडून मिळणार ही जमेची बाजू.

नरेगा या राष्ट्रीय योजनेची अंमलबजावणी ग्रामीण मंत्रालयांतर्गत केली जाते. केंद्रात आणि राज्यात ग्रामीण विकासमंत्र्यांकडे या योजनेची जबाबदारी आहे. ग्रामीण मंत्रालयात एका वेगळ्या कक्षाची निर्मिती करून त्याद्वारे ही अंमलबजावणी सुरू झाली. परंतु २००६ ते २००८ पर्यंत महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय, त्याचबरोबर गरजेप्रमाणे मनुष्यबळ आणि सोयीसुविधा या गोष्टी आपल्या राज्यात घडल्या नाहीत. २००९ पासून पुढे पाच-सहा वर्षांत अनेक शासन निर्णयांतून छोटे-मोठे बदल करत नरेगा आणि रोहयोची सांगड घालण्यात आली. या काळात नरेगाला चांगली चालना मिळाली. पण एक मूलभूत बदल अपेक्षित होता तो अंमलबजावणीच्या व्यवस्थापकीय रचनेसंबंधी. तो घेणे आता टाळता येणार नाही. आपल्या राज्यात दुष्काळात मदत करण्यासाठी आलेली योजना ही तेव्हा महसूल विभागाने राबवली. राज्यातील कृषी, जलसंधारण, सार्वजनिक बांधकाम, वने असे विविध विभाग तसेच महसूल यांनी मिळून ही योजना राबवली. पंचायत राज संस्थांच्या निर्मितीतून जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय रचना अस्तित्वात आली. ग्रामीण भागातील विकासकामे हेच या संस्थांचे प्रमुख काम असल्याने बहुतेक सर्व विकास योजनांची जबाबदारी त्यांच्याकडे आली. या संस्था निर्माण झाल्यानंतर नरेगा ग्रामीण मंत्रालयाअंतर्गत आल्याने, नरेगाची अंमलबजावणी आपसूकच या संस्थांची राहिली.

## संपादकीय »

### यंत्रणाकेंद्री शिक्षण

***धोरणात्मक पातळीवर विद्यार्थिकेंद्री शिक्षणाचा सातत्याने उल्लेख केला जात असला, तरी प्रत्यक्षात आपल्याकडील शिक्षण यंत्रणाकेंद्री आहे. सरकारी कार्यालयांमधील नोकरशहा आणि विद्यापीठांतील कर्मचारी यांमध्ये मूलत: काहीही फरक नाही.***


दोन्ही यंत्रणा सारख्याच अकार्यक्षम आणि उत्तरदायित्व झटकणाऱ्या. सेवा हमी कायदा वगैरे लागू करण्यात आला असला, तरी कार्यक्षमतेत दखलपात्र सुधारणा नाही. विद्यापीठांच्या परीक्षा हे याचे उत्तम उदाहरण. कोव्हिड साथरोग सुरू झाल्यापासून राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षांचे वेळापत्रक जे कोलमडले आहे, ते अद्याप पूर्ववत झालेले नाही. कोव्हिडची साथ आटोक्यात आल्यानंतर एक संपूर्ण शैक्षणिक वर्ष संपत आले; परंतु परीक्षांची घडी अद्याप विस्कटलेली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह राज्यातील बहुतेक विद्यापीठांत विविध अभ्यासक्रमांसाठी २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाची पहिली सत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्चमध्ये झाली. आता दुसरे सत्र सुरू होऊन महिना-दीड महिना लोटला, तरी अनेक अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झालेले नाहीत. दुसरी सत्र परीक्षा जुलैमध्ये होण्याची शक्यता आहे.

**समंजसपणा हा मानवी स्वभावाचा मूलभूत गुणधर्म. सारासार विचार करण्याची क्षमता हे त्या स्वभावाचे वैशिष्ट्य आणि त्यातून होणारी अभिजात कृती हे त्याचे व्यक्तिमत्त्व. या तिन्ही गुणांचा समुच्चय असणारे अनेक धुरीण भारतात समाजातील एकोपा टिकवून ठेवण्यासाठी अथक प्रयत्न करीत आले आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रांतात शेकडो वर्षांच्या संतपरंपरेतून सामान्यातल्या सामान्यांपर्यंत जो विचार पोहोचवला गेला, तो सहिष्णुतेचा.**

## धार्मिक द्वेषाने सामाजिक एकता बिघडते

त्यामागील सर्वंकष विचार करण्याच्या प्रेरणा या प्रांतातील माणसांचे आयुष्य वैचारिक आणि भावनिक पातळीवरही अभिजाततेच्या पातळीवर नेण्यास कारणीभूत ठरल्या. त्यामुळे रूढी-परंपरा यांमागील समंजसपणाची चौकट समजून घेऊन त्यांना सामोरे जाण्याची वृत्ती या प्रांती उपजली. त्र्यंबकमध्ये जे झाले, त्याने ही वृत्तीच नाकारली जात नाही ना, असा विचार सुज्ञांनी तरी करायलाच हवा. एखाद्या धार्मिक विचाराची आपण जोपासना करतो, तेव्हा अन्य धर्मातील अनेक चांगल्या गोष्टीही आपल्याला खुणावत असतातच. त्यामुळे त्याच भक्तिभावाने आणि श्रद्धेने विशिष्ट धर्माच्या प्रार्थनास्थळांमध्ये अन्य धर्मीयांना प्रवेश मिळत आला. अशा कितीतरी प्रार्थनास्थळांमध्ये मनोभावे जाणारे अनेक अन्य धर्मीय असतात. अशा कोणत्याही ठिकाणी जाण्यासाठी मनी भक्तीचा भाव दाटायला हवा. तो परिपूर्ण असेल, तर त्याला धर्माची, जातीची बंधने कशाला हवीत?

त्र्यंबकेश्वरातील मंदिरात दरवर्षी पायरीपर्यंत जाण्याची परंपरा पाळली जात असेल, तर त्याबद्दल कुणीही विरोध का करावा? कुणाला या मंदिरातील स्थापित शक्तीला नमन करण्याची इच्छा होणे, हे चांगले की वाईट? परधर्मीयांबद्दलची सहिष्णुता हा तर मानवी समाजाचा गुणधर्म असतो, असायला हवा. तसा तो असेल, तर कुणी कुठे जावे, कोणाला कुठे प्रवेश निषिद्ध असायला हवा, कोणाला कोठपर्यंत जाता यावे, यासारख्या यमनियमांमुळे हा भक्तिभाव आटण्याचीच शक्यता अधिक. दरवर्षी भक्तीचा मळा फुलवणाऱ्या पंढरपूरच्या वारीतील वारकऱ्यांना श्रद्धेने अन्नदान करणाऱ्या, त्यांच्यासाठी जागोजागी पाणपोया उभारणाऱ्या अन्य धर्मीयांचे अष्टभाव दाटलेले चेहरे अनेक वेळा पाहण्यात येतात. अनेक धार्मिक उत्सवांत अन्य धर्मीयांचा सहभाग हा या भूमीतील संतपरंपरेचा परिपाक आहे. वात्सल्य, निर्व्याज प्रेम, आदर, करुणा, कणव या



मानवाच्या मूलभूत संप्रेरणा असतात. त्यामध्ये रंग, रूप, जात कधी आड येत नाहीत. येतो तो मत्सर. तोही सत्ता, पद आणि संपत्तीतून निर्माण होतो. श्रीमंत, गरीब यांतील भेदभाव अधिक तीव्र होत जातो आणि त्यातून मानापमानाचे नाट्य उभे राहते. हीनत्वाची भावना माणसाच्या मनात निर्माण होते, ती या अवगुणांमुळे. मात्र, संपन्नतेची अभिजातता विचारांच्या मोकळेपणातूनच येते. सतत कुणा ना कुणाला पाण्यात पाहून, मिळणारा आनंद आसुरी असतो. कैवल्याच्या आनंदाचे जे गुणगान संतांनी केले, त्याची पूजा बांधल्यामुळेच संतपरंपरेत सर्व जातींना स्थान मिळाले. अन्य धर्मीयांनाही सामावून घेण्याची क्षमता

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पाच दिवस तापदायक!

## चाळिशीपार गेलेल्या तापमानात आणखी वाढ, उष्माघाताचे त्रास बळावण्याचा तज्ज्ञांचा इशारा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।



**मुंबईसह महाराष्ट्रामध्ये वाढत असलेल्या उन्हाच्या तडाख्यामुळे नागरिक हैराण झाले असतानाच पुढील पाच दिवस तापमानाचा पारा आणखी वाढण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. विदर्भ, मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत तापमान ४० अंश सेल्सियसपेक्षा जास्त असून यात आणखी भर पडल्यास उष्माघाताशी संबंधित आरोग्य तक्रारी वाढू शकतील, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.**

राज्यातील अनेक भागांत गेल्या काही दिवसांपासून उन्हाची तीव्रता वाढली आहे. पंधरा दिवसांहून अधिक काळ राज्यातील अनेक भागांतील कमाल तापमान ४० अंशांपेक्षा अधिक आहे. पुढील पाच दिवस दोन ते तीन अंशांनी तापमानात वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मराठवाडा, विदर्भाच्या तुलनेत कमाल तापमान कमी असले तरी आद्रतेमुळे कोकण किनारपट्टीवर अधिक उकाडा जाणवत आहे. मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर किनारपट्टी भागात तापमान वाढीबरोबरच आद्र्रताही वाढण्याची शक्यता आहे. राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये बुधवारी ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक कमाल तापमान नोंदवण्यात आले. सर्वाधिक (४२.४ अंश सेल्सिअस) तापमानाची नोंद अमरावती आणि वर्धा येथे करण्यात आली.

### राज्यात दुप्पट उष्माघाताचे रुग्ण

दरम्यान यंदा उष्माघाताच्या रुग्णांमध्येही गेल्यावर्षीच्या तुलनेत दुप्पटीपेक्षा अधिक वाढ झाली आहे. राज्यात १ मार्च ते १७ मे या कालावधीत १६१६ उष्माघाताच्या संशयित रुग्णांची नोंद झाली. गेल्यावर्षी याच कालावधीत ७६१ रुग्णांची नोंद झाली होती.

उष्माघातामुळे सातत्याने शरीराचे निर्जलीकरण होऊन मेंदूतील रक्तवाहिन्यांमधील रक्त गोठून तीव्र झटका येण्याच्या शक्यता असते. यामुळे व्यक्तीचा मृत्यूही होऊ शकतो. मागील महिन्याभरात मुंबईतील प्रत्येक रुग्णालयांमध्ये साधारणपणे ८ ते १० रुग्ण दाखल झाले आहेत. त्यामुळे नागरिकांनी घरातून बाहेर पडताना आवश्यक ती काळजी घ्यावी, असा सल्ला तज्ज्ञ डॉक्टरांनी दिला आहे.

### मजूर, कामगारांना धोका

» उन्हात काम करणारे मजूर, कामगार, दुपारी फिरणाऱ्या तरुणांना 'सेरेब्रल व्हिनस सायनस थ्रोम्बॉयसिस'चा त्रास दरवर्षी उन्हाळ्यामध्ये कमी अधिक प्रमाणात होतो. मात्र मागील महिनाभरापासून हा त्रास होणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. रुग्णालयामध्ये महिनाभरात किमान ७ ते ८ रुग्ण आले असून, त्यातील किमान दोन रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता भासते आहे, अशी माहिती मुंबईतील नायर रुग्णालयातील न्युरोलॉजी विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. पांडुरंग बारवे यांनी दिली.

### काय होते?

» उष्णतेमुळे शरीराची पाणी आणि क्षार बाहेर फेकून तापमान नियंत्रित ठेवण्याची प्रक्रिया सुरू असते. मात्र पाणी, लिंबू पाणी, विविध पेयांचे सेवन न झाल्यास व्यक्तीच्या शरीराचे निर्जलीकरण होऊन त्याला उष्माघाताचा त्रास होतो. मात्र निर्जलीकरण होण्याची प्रक्रिया सातत्याने होऊ लागल्यास किंवा शरीराची पाण्याची आवश्यकता पूर्ण करण्याकडे दुर्लक्ष केल्यास व्यक्तीच्या मेंदूला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांमधील रक्त हळूहळू गरम होऊन घट्ट होते. त्यामुळे रक्तवाहिन्यांमधील रक्त गोठून व्यक्तीला तीव्र झटका येण्याची शक्यता असते. या झटक्याला वैद्यकीय भाषेत 'सेरेब्रल व्हिनस सायनस थ्रोम्बॉयसिस' असे म्हणतात. हा झटका तीव्र असल्यास व्यक्तीचा मृत्यूही होऊ शकतो. मागील महिन्याभरात हा त्रास होणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत आहे. त्यात २५ ते ३५ वयोगटातील तरुणांचे प्रमाण अधिक आहे. सातत्याने उन्हामध्ये काम करत असल्याने हातापायाला मुंग्या येणे, सतत डोके दुखणे, थकवा वाढणे अशी लक्षणे दिसत असतील तर तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, अशी माहिती कोकिलाबेन धीरुभाई अंबानी रुग्णालयाचे क्रिटिकल केअर विभागाचे संचालक डॉ. भरत जगियासी यांनी दिली.

---

# उद्धव ठाकरे यांची पुन्हा पक्षप्रमुखपदी निवड?

## शिवसेना राष्ट्रीय कार्यकारिणीची 18 जूनला बैठक

। मुंबई। महाईन्यूज । प्रतिनिधी।



**शिवसेना राष्ट्रीय कार्यकारिणी, राज्य कार्यकारिणी आणि राज्यभरातील पदाधिकाऱ्यांची बैठक १८ जूनला मुंबईत होणार असून त्यात उद्धव ठाकरे यांची पुन्हा पक्षप्रमुखपदी निवड केली जाण्याची शक्यता आहे. शिवसेना फुटीनंतर आणि ठाकरे यांच्या पक्षप्रमुखपदाची मुदत २३ जानेवारी २०२३ रोजी संपल्यानंतर प्रथमच ही बैठक होणार आहे.**

केंद्रीय निवडणूक आयोगाने शिंदे गटाला शिवसेना मूळ पक्ष म्हणून मान्यता दिली आहे. या निर्णयास आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असून उन्हाळी सुट्टीनंतर जुलैमध्ये ती सुनावणीसाठी येईल. त्यामुळे आयोगाच्या निर्णयानुसार शिंदे गट हाच मूळ शिवसेना पक्ष आहे. अंधेरी व कसबा पोटनिवडणुकीच्या वेळी आयोगाने ठाकरे गटाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) असे नाव आणि मशाल निवडणूक चिन्ह दिले आणि न्यायालयाने तो निर्णय पुढील आदेशापर्यंत कायम राहील, असे स्पष्ट केले आहे. ठाकरे यांची पक्षप्रमुखपदाची मुदत संपल्याने आणि विधानसभा अध्यक्षांनी आमदार अपात्रतेच्या याचिकांवर कार्यवाही सुरु केल्याने कायदेशीर आणि तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यासाठी ठाकरे गटाने पावले उचलली आहेत.ठाकरे यांनी राष्ट्रीय व राज्य कार्यकारिणी सदस्य आणि पक्ष पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या. त्यांची लोकशाही पध्दतीने निवड झाली पाहिजे, असे आयोगाने आपल्या आदेशात म्हटले होते. त्यामुळे विधानसभा अध्यक्षांपुढील सुनावणी, निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयापुढे कोणत्याही कायदेशीर व तांत्रिक त्रुटी राहू नयेत, यासाठी कार्यकारिणी व पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत आवश्यक ठराव आणि कार्यकारिणी सदस्य व पदाधिकाऱ्यांची निवड केली जाईल. आमचा गट हीच मूळ शिवसेना असून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख म्हणून ठाकरे यांची निवड केल्यास आणि कार्यकारिणी व पदाधिकाऱ्यांची निवड केल्यास शिवसेना मूळ पक्षावरील अधिकार सोडल्याचा निष्कर्ष काढला जाण्याची भीती आहे.

# "मविआ फुटायला सुरुवात, प्रकाश आंबेडकर यांचा दावा

। ठाणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।



वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी महाविकासआघाडीबाबत मोठं विधान केलं आहे. मविआ फुटायला सुरुवात झाली आहे, असा दावा प्रकाश आंबेडकरांनी केला.

तसेच मुंबई महानगरपालिकेत काँग्रेस मविआबरोबर लढणार नसून स्वतंत्र लढणार असल्याचंही त्यांनी म्हटलं. ते बुधवारी (१७ मे) मुंबईत टीव्ही ९ मराठीला दिलेल्या प्रतिक्रियेत बोलत होते.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, "आम्ही वेगवेगळ्या पक्षातील असलो, तर माझे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यातील व्यक्तिगत संबंध चांगले आहेत. त्यामुळे मला कुणाकडेही जायला वेळ लागत नाही."

"काँग्रेसने आधीच जाहीर केलंय की, मुंबई महानगरपालिकेत ते महाविकासआघाडीत नसून स्वतंत्र लढणार आहेत.

त्यामुळे मविआ फुटायची सुरुवात झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अधिक जास्त घटना घडणार आहेत. तिथं काय होतं हे पाहून आणखी काही पक्ष भूमिका घेतील," असं मत प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केलं.

# मुख्यमंत्री निवडीचा पेच कायम

## कर्नाटकात तडजोडीचे पर्याय स्वीकारण्यास शिवकुमार यांचा नकार

### सहमती घडवून आणण्याचे काँग्रेसचे प्रयत्न

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कर्नाटकच्या मुख्यमंत्रीपदाचा पेच कायम असताना सिद्धरामय्या यांची मुख्यमंत्रीपदी निवड झाल्याचे समजून त्यांच्या समर्थकांनी बुधवारी त्यांच्या निवासस्थानाबाहेर जल्लोष केला. कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदाच्या निवडीचा घोळ बुधवारी दिवसभरातील नाट्यमय घटनांनंतरही कायम राहिला. काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने समोर ठेवलेले तडजोडीचे पर्याय शिवकुमार यांनी स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे नव्या मुख्यमंत्र्याची घोषणा घाईघाईने न करण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला.**



दिवसांत त्यांच्यात सहमती घडवून आणण्याचा प्रयत्न केला जाईल, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

सिद्धरामय्या यांनी बुधवारी सकाळी अकराच्या सुमारास 'दहा जनपथ'वर राहुल गांधी यांची भेट घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा लगेचच केली जाईल, असे संकेत पक्षाकडून देण्यात आले होते. मात्र मुख्यमंत्री होणार नसेल तर फक्त आमदार म्हणून पक्षासाठी काम करत राहीन, अशी ताठर भूमिका शिवकुमार यांनी पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंशी झालेल्या दोन तासांच्या क्षणी मागे घ्यावा लागला.

कर्नाटकच्या बहुतांश नवनियुक्त आमदारांनी पसंती दिल्यामुळे मुख्यमंत्रीपदी सिद्धरामय्यांची निवड निश्चित मानली जात होती. मात्र शिवकुमार यांनी बुधवारी काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांची 'दहा जनपथ'वर भेट घेतली. तिथून शिवकुमार हे 'दहा राजाजी' रोडवरील खरगेंच्या निवासस्थानी गेले. त्यांच्यातील प्रदीर्घ चर्चेनंतर शिवकुमार यांनी, 'मुख्यमंत्री पदासंदर्भात अजून कोणताही निर्णय झालेला नाही', असे पत्रकारांना सांगितले. या विधानामुळे शिवकुमार माघार घेणार नसल्याचे स्पष्ट झाले. सिद्धरामय्यांनी दोन वर्षे मुख्यमंत्री पदी राहावे, त्यानंतर ३ वर्षे हे पद शिवकुमार यांना दिले जाईल वा सिद्धरामय्यांनी पाच वर्षे मुख्यमंत्री राहावे व शिवकुमार यांनी उपमुख्यमंत्रीपद, महत्त्वाची खाती सांभाळावीत. तसेच, प्रदेशाध्यक्षपदीही कायम राहावे, असे दोन प्रस्ताव देण्यात आले आहेत. त्यातील एकही प्रस्ताव शिवकुमारांनी स्वीकारलेला नाही.

दिल्लीत शिवकुमार व सिद्धरामय्या हे ४८ तासांहून अधिक काळ ठाण मांडून आहेत. काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाकडून अधिकृतपणे निर्णयाची घोषणा होत नाही, तोपर्यंत दोन्ही मुख्यमंत्री पदाचे दावेदार राजधानीत राहणार असल्याचे सांगितले जाते. सिद्धरामय्यांनी बुधवारी राहुल गांधींची भेट घेतल्यानंतर 'कर्नाटक भवन'मध्ये समर्थक आमदारांना बदललेल्या परिस्थितीची माहिती दिली. आमदारांची मते जाणून घेण्यासाठी पाठवलेल्या तीनही निरीक्षकांशी खरगेंनी बुधवारी पुन्हा चर्चा केली. खरगेंनी मुख्यमंत्री पदाच्या निवडीत तटस्थ राहण्याची भूमिका घेतली असून ते अन्य काँग्रेस नेत्यांचे म्हणणे ऐकून घेत आहेत. 'दोन्ही नेत्यांशी खरगेंनी सविस्तर चर्चा केली असून मुख्यमंत्र्याचा निर्णय पक्षाध्यक्ष घेतील', असे सुरजेवाला म्हणाले.

### शिवकुमार यांनाही आमदारांचा पाठिंबा

» कर्नाटकच्या शंभरहून अधिक काँग्रेस आमदारांचा सिद्धरामय्या यांना पाठिंबा असल्याने काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने त्यांच्या निवडीला हिरवा कंदिल दिला होता, असे समजते. मात्र लिंगायत व वोक्कलिग या समाजातील आमदारांनी शिवकुमार यांच्या बाजूने वजन टाकले असून शिवकुमार यांना पाठिशी असणाऱ्या संख्याबळात वाढ होऊ लागली आहे. कर्नाटकच्या शेजारी असलेल्या तेलंगणातील काही काँग्रेस नेत्यांनी शिवकुमारांना पाठिंबा दिला आहे. शिवकुमार यांच्या नेतृत्वाचा तेलंगणातील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला मोठा फायदा होईल, असे त्यांचे म्हणणे आहे.

---

## देशभरात ९ लाख मुले-मुली शाळाबाह्य उत्तर प्रदेश, बिहारप्रमाणे महाराष्ट्राची कामगिरी निराशाजनक!

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शासकीय आकडेवारीनुसार सरलेल्या शैक्षणिक वर्षांत ५ लाख २७ हजार मुले आणि ४ लाख २७ हजार ७२८ मुलींनी शाळेचा उंबरठा ओलांडलेला नाही. महाराष्ट्रातील १५ हजारांहून अधिक मुले-मुली शाळाबाह्य असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. उत्तरप्रदेशात सर्वाधिक, ३ लाख ९६ हजार ६५५ बालके शिक्षणापासून वंचित असून त्यात २ लाख १६ हजार ७८९ मुलांचा तर १ लाख ७९ हजार ८६६ मुलींचा समावेश आहे.**



बिहारमध्ये १ लाख ३४ हजार २५२, गुजरातमध्ये १ लाख ६ हजार ८८५ जण शिक्षणाच्या मूलभूत हक्कापासून वंचित राहिले आहेत. इतर काही राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राची स्थिती बरी असली तरी चित्र काहीसे निराशाजनक आहे. राज्यात ८ हजार ४७८ मुले आणि ७ हजार २२९ मुली असे १५,७०७ जण शाळाबाह्य राहिले आहेत. योजनांचा फायदा काय? विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण हक्क कायदा (आरटीई), समग्र शिक्षण योजना, बेटी बचाओ, बेटी पढाओ, माध्यान्ह भोजन अशा विविध योजना राबविल्या जात आहेत. मात्र, प्रत्यक्षात लाखो बालके औपचारिक शिक्षण प्रवाहातून बाहेरच असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या योजनांचा फोलपणा अधोरेखित होत असल्याची टीका तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे.

---

## 'ते' महापालिका अस्थिर करू शकतील! नायब राज्यपालांच्या अधिकारांवरून न्यायालयाची टिप्पणी

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिल्ली महापालिकेवर ज्येष्ठ सदस्यांना नामनिर्देशित करण्याचा अधिकार नायब राज्यपालांना दिल्यास त्यामुळे निवडून आलेली स्थानिक स्वराज्य संस्था ते अस्थिर करू शकतात, अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी केली. त्याच वेळी या नमानिर्देशनांची इतकी काळजी करण्याचे केंद्र सरकारला कारण काय, असा सवाल न्यायालयाने केला.**



दिल्ली महापालिकेवर ज्येष्ठ सदस्यांना नामनिर्देशित करण्याचा अधिकार नायब राज्यपालांना दिल्यास त्यामुळे निवडून आलेली स्थानिक स्वराज्य संस्था ते अस्थिर करू शकतात, अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी केली. त्याच वेळी या नमानिर्देशनांची इतकी काळजी करण्याचे केंद्र सरकारला कारण काय, असा सवाल न्यायालयाने केला. दिल्ली महापालिकेमध्ये २५० निवडून आलेले सदस्य आणि १० नामनिर्देशित सदस्य असतात. या सदस्यांचे नामांकन करण्याच्या नायब राज्यापालांच्या अधिकाराला आव्हान देणारी याचिका दिल्ली सरकारने केली आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. पी.एस. नरसिंहा व न्या. जे.बी. पारडीवाला यांच्या खंडपीठासमोर याप्रकरणी सुनावणी पूर्ण झाली असून न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. सुनावणीदरम्यान '१२ विशेष व्यक्तींना महापालिकेत नामनिर्देशित करण्याचा अधिकार नायब राज्यपालांना दिल्यास लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या महापालिका समित्यांना ते अस्थिर करू शकतील. कारण त्यांना (नामनिर्देशित सदस्यांना) मताधिकारही आहे,' असे खंडपीठाने नमूद केले. नायब राज्यपालांच्या वतीने अतिरिक्त महान्यायअभिकर्ता संजय जैन यांनी तर दिल्ली सरकारच्या बाजूने ज्येष्ठ विधिज्ञ अभिषेक मनू सिंघवी यांनी बाजू मांडली.

# हिंदुत्व आणि राजकीय विषयांवर भाष्य करणे कंगना राणौतला पडले होते महागात

कंगना रणौत सोशल मीडियावर काही ना काही पोस्ट करीत असते. ती कधी वादग्रस्त विधाने तर कधी पोस्टच्या माध्यमातून कोणाचे तरी कौतुक करीत असते. बऱ्याचदा कंगना देशातील महत्त्वाच्या समस्यांबद्दल भाष्य करते, याबरोबरच ती तिच्या सोशल मीडियाच्या माध्यमातून स्वतःची मते बिनधास्त आणि परखडपणे मांडत असते. कंगनाच्या याच गुणांमध्ये अनेकदा तिला अडचणींचा सामना करावा लागला आहे. हिंदुत्व आणि राजकीय विषयांवर भाष्य करणे कंगना रणौतला चांगलेच महागात पडले होते. खुद्द कंगनाने पोस्ट करीत याबाबत खुलासा केला आहे.

खरे तर, कंगना रणौतने अलीकडेच इलॉन मस्कच्या पोस्टवर तिच्या प्रतिक्रियेत लिहिले आहे की, हिंदुत्वावर वक्तव्ये केल्यामुळे आणि राजकीय मुद्द्यांवर भाष्य केल्यामुळे तिला खूप त्रास सहन करावा लागला आहे. तिला अनेक ब्रॅण्डमधून वगळण्यात आले.



त्यामुळे तिचे सुमारे ३० ते ४० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. कंगना रणौतने ॲलन मस्कीची एक बातमी शेअर केली आहे, ज्यामध्ये असे लिहिले आहे की, 'मला जे पाहिजे ते मी बोलेन, जरी मला आर्थिक नुकसान सहन करावे लागले तरी.' हे विधान शेअर करताना कंगनाने लिहिले की खरे स्वातंत्र्य आणि यशाचे चरित्र. हिंदुत्वासाठी बोलणे, राजकारणी, देशद्रोही, तुकडे गँग, यांच्या विरोधात वक्तव्ये केल्यामुळे त्यांनी मला एका रात्रीतून २० ते २५ ब्रॅण्डच्या जाहिरातींमधून काढून टाकले.

# सलमान खानची बहीण अर्पिताच्या घरी चोरी

बॉलिवूड अभिनेता सलमान खानची बहीण अर्पिता खानच्या घरी चोरी झाली आहे. अर्पिताच्या मुंबईतील घरात १६ मे(मंगळवारी) चोरी झाल्याची माहिती समोर आली आहे. अर्पिताच्या घरातून तिचे हिऱ्याचे कानातले चोरी झाली आहेत. या कानातल्यांची किंमत सुमारे ५ लाख इतकी आहे.

एएनआयने दिलेल्या माहितीनुसार, अर्पिताच्या घरी काम करणाऱ्या नोकरानेच चोरी केल्याचं समोर आलं आहे. अर्पिताच्या घरी चोरी करणाऱ्या या नोकराचं नाव संदीप हेगडे असून त्याचं वय ३० वर्ष आहे. मुंबईतील विलेपार्ले भागात तो राहण्यास आहे. अर्पिताच्या घरी चोरी करणाऱ्या संदीप हेगडेला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे.

"काही दिवसांनी असे लोक रस्त्यावर सेक्स करतील", प्रसिद्ध मराठी अभिनेत्रीच्या पोस्टवर नेटकऱ्याची कमेंट, उत्तर देत म्हणाली "स्त्रियांबद्दल..."





घरात चोरी झाल्यानंतर अर्पिताने पोलिसांत तक्रार दाखल केली होती. हिऱ्याचे कानातले चोरी झाल्याचं अर्पिताने तक्रारीत म्हटलं होतं. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरू करत त्याच रात्री आरोपी संदीप हेगडेला अटक केली. दरम्यान, अर्पिता खानने २०१४ साली अभिनेता आयुष शर्माशी लग्नगाठ बांधली. त्यांना दोन मुलं आहेत. आयुष शर्माने अनेक बॉलिवूड चित्रपटांमध्ये काम केलं आहे.





# बालवीर चालला चंद्रावर; टीव्हीवर नाही, प्रत्यक्षात!

जपानचे उद्योगपती युसाकू मेझावा यांनी नुकतंच चंद्राच्या सफरीची घोषणा केली आहे. या सहलीसाठी काही जणांना निवडण्यात आलं आहे. यामध्ये काही युट्यूबर्स तसंच अभिनेत्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे भारतातला एक प्रसिद्ध आणि लोकप्रिय चेहराही या सहलीला जाणार आहे. पुढच्या वर्षी चंद्रावर सहल जाणार आहे, इलॉन मस्कच्या स्पेस एक्स रॉकेट्समधून हे सगळे चंद्रावर जाणार आहेत. यामध्ये आठ जणांचा समावेश आहे. अमेरिकेतून डीजे आणि निर्माता स्टीव्ह ऑकी, अमेरिकन युट्युबर टीम डॉड, झेक आर्टिस्ट येमी एडी, आयर्लंडची फोटोग्राफर रिहाना ॲडम, ब्रिटीश फोटोग्राफर करिम लिया, अमेरिकन फिल्ममेकर ब्रेंडन हॉल आणि भारतीय अभिनेता देव जोशी तसंच साऊथ कोरियातला संगीतकार टॉप याचा समावेश आहे. चंद्रावर सहलीसाठी निवड करण्यात आलेल्या या भारतीय अभिनेत्याचं नाव आहे देव जोशी. देव जोशीला घराघरात बालवीर या नावाने ओळखलं जातं. याच नावाच्या मालिकेतून तो लोकप्रिय झाला होता. लहान मुलांमध्ये त्याची प्रचंड क्रेझ आहे. देवने २०हून अधिक गुजराती चित्रपटांमध्ये काम केलं आहे. त्याने चंद्रशेखर या मालिकेमध्ये चंद्रशेखर आझाद यांची भूमिका साकारली होती. मेझावा यांनी या प्रवासासाठी स्पेस एक्सच्या रॉकेटमधली प्रत्येक जागा खरेदी केली आहे. हे रॉकेट २०१८ पासून कार्यरत आहे. मेझावा यांनी ट्वीटरवरुन याची घोषणा केली असून त्यांच्या #DEARMOON प्रोजेक्टसाठी करण्यात आलेल्या वेबसाईटवरुनही त्यांनी हे सांगितलं आहे. स्पेस एक्सच्या स्टारशिपला लॉंच झाल्यापासून पृथ्वीवर परतण्यासाठी आठ दिवस लागतील. हे यान चंद्राच्या तीन फेऱ्या पूर्ण करेल. २०२३ मध्ये या फेरीचं नियोजन करण्यात आलं आहे, पण या यानाच्या चाचण्या होत असल्याने नियोजनात बदल होऊ शकतो.

# अशोक सराफ यांच्या एका सल्ल्याने बदललं सायली संजीवचे आयुष्य!





मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून सायली संजीवला ओळखले जाते. सध्या ती तिच्या 'गोष्ट एका पैठणीची' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वीच हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने सायली संजीवने तिच्या यशस्वी करिअरबद्दल सांगितले. यावेळी तिने तिच्या आयुष्यात महत्त्वाच्या असलेल्या दोन व्यक्तींबद्दल सांगितले.

गोष्ट एका पैठणीची हा चित्रपटामुळे सायली संजीव ही सध्या सातत्याने चर्चेत आहे. या चित्रपटात सायली ही मुख्य भूमिकेत झळकताना दिसत आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने सायलीने 'महाराष्ट्र टाईम्स'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने तिच्या यशस्वी होण्यामागे दोन महत्त्वाच्या व्यक्ती असल्याचं सांगितले. हे दोन व्यक्ती म्हणजे एक तिचे वडील संजीव आणि दुसरे म्हणजे ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ. सायली संजीव ही अशोक सराफ यांना वडिलांच्या समान मानते. या मुलाखतीत सायलीने त्या दोघांचा अतिशय कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला.

# दीपिका पादुकोण साकारणार 'लेडी सिंघम'ची भूमिका

बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पादुकोणने आपल्या अभिनयाची छाप फक्त बॉलिवूडमध्येच नाही तर हॉलिवूडमध्ये देखील उमटवली आहे. सध्या दीपिकाचं नाव बॉलिवूडमधील टॉप अभिनेत्रींमध्ये घेतलं जातं. आगामी काळात दीपिकाचे बरेच चित्रपट प्रदर्शित होणार आहेत. सध्या दीपिका त्याच चित्रपटांच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. दरम्यान, आता दीपिकाच्या हाती आणखी एक चित्रपट लागला आहे. लव्ह स्टोरी आणि रोमँटिक चित्रपट तयार करणारी दीपिका आता लवकरच ॲक्शन देखील करताना दिसत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, दीपिका पादुकोण लवकरच प्रसिद्घ चित्रपट दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या आगामी 'सिंघम अगेन' चित्रपटामध्ये दिसणार आहे. रोहित शेट्टीच्या या चित्रपटामध्ये दीपिका लेडी सिंघमची भूमिका साकारणार आहे. नुकत्याच काही दिवसांपूर्वी सिंघम फ्रेंचायजीच्या तिसऱ्या चित्रपटाची घोषणा करण्यात आली होती.



# बंगळूरुला विजय अनिवार्य!

## » सनरायजर्स हैदराबादविरुद्ध आज सामना; कोहली, डयूप्लेसिसकडे लक्ष

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघाचा सामना इंडियन प्रीमियर लीगमध्ये (आयपीएल) गुरुवारी सनरायजर्स हैदराबादशी होणार असून,‘प्ले-ऑफ’मधील आव्हान कायम राखण्यासाठी त्यांना या सामन्यात विजय अनिवार्य आहे.**

बंगळूरुचा संघ १२ सामन्यांत १२ गुणांसह पाचव्या स्थानावर आहे. त्यांना ‘प्ले-ऑफ’मध्ये स्थान मिळवण्यासाठी उर्वरित दोन सामन्यांत विजय मिळवणे गरजेचे आहे. त्यासाठी संघाला चमकदार कामगिरीशिवाय पर्याय नाही. हैदराबाद संघाचे १२ सामन्यांत ८ गुण असून ते ‘प्ले-ऑफ’च्या शर्यतीतून बाहेर पडले आहेत. मात्र, तरीही हैदराबादचा संघ बंगळूरुला रोखण्याचा प्रयत्न करेल.

### बंगळूरुची मदार फलंदाजांवर

कर्णधार फॅफ डयूप्लेसिससह कोहलीने बंगळूरुसाठी या सत्रात सर्वाधिक धावा केल्या आहेत. मात्र, सलग दोन सामन्यांतील अपयशानंतर कोहलीचा प्रयत्न हैदराबादविरुद्ध चांगल्या कामगिरीचा असेल. डयूप्लेसिसने १२ सामन्यांत ५७.३६च्या सरासरीने ६३१ धावा केल्या असून तो सर्वाधिक धावा बनवणाऱ्या फलंदाजांमध्ये अग्रस्थानी आहे तर, कोहलीने ३९.८१च्या सरासरीने ४३८ धावा केल्या आहेत. कोहलीच्या फलंदाजीत सातत्याचा अभाव दिसत आहे.

या दोघांशिवाय ग्लेन मॅक्सवेलकडून संघाला अपेक्षा असतील. मॅक्सवेलने आतापर्यंत पाच अर्धशतके झळकावली आहेत. या तिघांव्यतिरिक्त इतर फलंदाजांना छाप पाडता आलेली नाही. गेल्या सामन्यातील विजयानंतर संघाचा आत्मविश्वास दुणावला असेल.



### त्रिपाठी, मार्करमकडून अपेक्षा

हैदराबादचा संघ ‘आयपीएल’च्या हंगामातून बाहेर पडणारा दुसरा संघ ठरला. त्यामुळे या सामन्यात हैदराबादचा संघ आपल्या आत्मसन्मानासाठी खेळेल.

हैदराबादचा प्रयत्न उर्वरित दोन सामन्यांत विजय मिळवत चाहत्यांना आनंद देण्याचा असेल. गोलंदाजी व फलंदाजी दोन्ही आघाडय़ांवर संघाला या सत्रात चमक दाखवता आली नाही. फलंदाज हेन्रिक क्लासेन, राहुल त्रिपाठी वगळता इतर कोणालाही फारसे योगदान देता आले नाही. कर्णधार एडीन मार्करमच्या खराब लयीचा फटका संघाला बसला आणि त्यामुळे संघाच्या अडचणी वाढल्या.

### सनरायझर्सच्या तीन विकेट पडल्या

»सनरायझर्स हैदराबादने 16 ते 20 षटकांमध्ये तीन विकेट गमावल्या. या कालावधीत त्याने केवळ 32 धावा केल्या. एकेकाळी त्याला विजयासाठी 30 चेंडूत 38 धावा करायच्या होत्या, पण संघाला हे सोपे लक्ष्य गाठता आले नाही. क्लासेन आणि मार्करामची खेळी व्यर्थ गेली सनरायझर्स हैदराबादकडून कर्णधार एडन मार्करामने 41 आणि हेनरिक क्लासेनने 36 धावा केल्या. दोघांनी पाचव्या विकेटसाठी 47 चेंडूत 70 धावांची भागीदारी केली. एकवेळ सनरायझर्सची धावसंख्या 6.2 षटकांत 4 बाद 54 अशी होती. राहुल त्रिपाठी 20, मयंक अग्रवाल 18, अभिषेक शर्मा नऊ धावा करून बाद झाले. हॅरी ब्रूकला खातेही उघडता आले नाही. चार विकेट पडल्यानंतर मार्कराम आणि क्लासेनने संघाला माघारी आणले. अखेरीस, अब्दुल समदने 18 चेंडूत 21 धावा निश्चित केल्या, पण त्याला सामना पूर्ण करता आला नाही. समदने पुन्हा एकदा फ्रँचायझीची निराशा केली.

---

# भारताशी कसोटी मालिका खेळण्याचा पाकिस्तानचा घाट

## » कोणत्याही प्रकारच्या मालिकेचा विचार नसल्याचे प्रत्युत्तर

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**पाकिस्तानने पुन्हा एकदा भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेचा घाट घातला. एवढेच नव्हे तर ही मालिका ऑस्ट्रेलिया, इंग्लंड किंवा दक्षिण आफ्रिका या त्रयस्थ देशात होऊ शकते अशी टिप्पणीही पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष नजम सेठी यांनी केली. मात्र या प्रकारच्या कोणत्याही मालिकेचा बीसीसीआयने विचार नसल्याचे प्रत्युत्तर भारतीय बोर्डाकडून देण्यात आले.**



भारत आणि पाकिस्तान यांच्यातील कसोटी मालिका ऑस्ट्रेलिया, इंग्लंड किंवा दक्षिण आफ्रिकेत होऊ शकते. मात्र या मालिकेसाठी सर्वाधिक पसंती इंग्लंडला असू शकेल. ऑस्ट्रेलियात मालिका हाऊसफुल होणार असेल, तर आमची काहीच हरकत नाही, असे पाकिस्तान बोर्डाचे अध्यक्ष सेठी यांनी सिडनी मॉर्निंग हेराल्डला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.

सेठी यांनी या मुलाखतीत आशिया कपच्या पाकिस्तानातील संयोजनास भारताकडून होत असलेल्या विरोधावरून टीका केली. मात्र त्याचवेळी भारताविरुद्धच्या मालिकेचीही संकल्पना मांडली. भारत आणि पाकिस्तानमध्ये २०१३ पासून एकही मालिका झालेली नाही. तर दोन देशातील अखेरची २००७च्या डिसेंबरमध्ये झाली आहे.

यंदा आशिया कप आणि वर्ल्ड कप या दोन महत्त्वाच्या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तानमध्ये लढत होईल. मात्र आशिया कप अनिश्चिततेच्या भोवऱ्यात आहे. त्याचवेळी पाकिस्तान भारतातील वर्ल्ड कपवर बहिष्कार घालण्याचा विचार करीत असल्याचे सांगत आहेत. ``नजिकच्या दिवसात भारत आणि पाकिस्तान यांच्यात कसोटी मालिका खेळवण्याची कोणतीही योजना नाही. आम्ही पाकिस्तानविरुद्धच्या मालिकेसाठी अद्याप तयार नाही," असे भारतीय क्रिकेट बोर्डाच्या सूत्रांनी सांगितले.

एकिकडे विश्वचषक आणि आशिया चषक यांच्यातील घोळ सुरु आहे. त्यामध्ये आता पाकिस्तानने भारताबरोबर कसोटी मालिका खेळण्याचे खुळ काढले आहे. त्यामुळे आता त्यांचा हा नवीन कोणता डाव आहे, हे बीसीसीआय जाणून घ्यायचा प्रयत्न करत असेल. पण दुसरीकडे भारताबरोबर खेळण्यासाठी पाकिस्तानचे क्रिकेट मंडळ उतावीळ झाले आहे. या सर्व गोष्टींमध्ये काही आर्थिक गोष्टीही आहेत आणि त्यामुळेच पाकिस्तान भारताबरोबर खेळण्यासाठी उत्सुक आहे. त्यासाठी त्यांनी त्रयस्थ ठिकाणांचा पर्यायही सुचवला आहे.

---

# पंजाबच्या पराभवानंतर मुंबईसाठी गुड न्यूज, रोहित शर्माची चिंता सामना न खेळताही मिटली

। धरमशाला ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

सामना न खेळताही रोहित र्माची चिंता मिटल्याचे पाहायला मिळाले. कारण दिल्ली आणि पंजाबच्या सामन्यानंतर आता मुंबई इंडियन्सच्या संघासाठी एक आनंदाची बातमी आली आहे.

पंजाब आणि राजस्थान यांच्यातील सामन्यावर मुंबई इंडियन्यचे भवितव्य अवलंबून होते. जर या सामन्यात पंजाबचा संघ विजयी ठरला असता तर मुंबई इंडियन्सला धक्का बसला असता आणि रोहित शर्माची चिंता वाढली असती. पण या सामन्यात दिल्लीने पंजाबवर दमदार विजय साकारला आणि त्यामुळे आता हा सामना संपल्यावर मुंबई इंडियन्ससाठी आनंदाची बातमी आली आहे.

मुंबईचा सामान नसला तरी गुणतालिकेत त्यांचे धाबे या सामन्यामुळे दणाणले होते. लखनौच्या सामन्यापूर्वी मुंबईचा संघ १४ गुणांसह तिसऱ्या स्थानावर



होता. पण या सामन्यात त्यांचा पराभव झाला आणि लखनौने दोन गुणांची कमाई केली. लखनौचा संघ यापूर्वी चौथ्या स्थानावर होता. विजयासह त्यांनी मुंबईच्या संघाला धक्का दिला आणि त्यांनी तिसरे स्थान पटकावले आहे. त्यामुळे मुंबईच्या संघाची आता चौथ्या स्थानावर घसरण झाली आहे. या सामन्यापूर्वी पंजाबच्या संघाने सहा विजयांसह १२ गुण मिळवले होते. दिल्लीच्या सामन्यात जर पंजाबच्या संघाने विजय मिळवला असता तर त्यांचे १४ गुण झाले असते. त्यामुळे मुंबई आणि पंजाब यांच्यात समान १४ गुण झाले असते.